CMYK

चाळी पोलिसांची वरली मटका अड्ड्यावर धाड >> पान 2

महावितरणच्या भोंगळ कारभाराबाबत नागरिकांच्या दैनिक 'आपला विदर्भ'कडे तक्रारी वाढल्या >> पान 3

जनतेला चांगली आरोग्य सेवा देण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकार एकत्र काम करू >> पान 4

दैनिक


# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

**सुविचार**

यश मिळवायचं असेल तर स्वत:च स्वत:वर काही बंधन घाला.



लपून छपून डेटींग अॅप्स वापरतात हे बॉलिवूड स्टार्स

आतील पान

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 52 ■ शनिवार, दि. 28 सप्टेंबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006








# उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या मंत्रालयातील कार्यालयाची अज्ञात महिलेकडून तोडफोड

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : राज्याचे उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मंत्रालयातील कार्यालयाची एका अज्ञात महिलेने तोडफोड केल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेमुळे एकच खळबळ उडाली आहे. प्राथमिक माहितीनुसार, संबंधित महिला पास न काढता मंत्रालयात शिरली. सचिवांसाठी असलेल्या गेटने महिलेने मंत्रालयात प्रवेश केला. या महिलेने देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यालयाची तोडफोड केली. त्यानंतर ही महिला इथून निघून गेली. या घटनेचा व्हिडीओ समोर आल्यानंतर एकच खळबळ उडाली आहे. त्यामुळे आता पोलिसांनी या महिलेचा शोध सुरु केला आहे. पोलीस आयुक्तांनी या घटनेची गंभीर दखल घेतली असून म हिलेचा शोध युद्धपातळीवर सुरु आहे.

मात्र, या घटनेमुळे मंत्रालयाच्या सुरक्षा व्यवस्थेतील गंभीर त्रुटी समोर आल्या आहेत. ही महिला गुरुवारी रात्री मंत्रालयात शिरली. त्यावेळी मंत्रालयाच्या परिसरात फारसा पोलीस बंदोबस्त नव्हता. त्यामुळे ही महिला कोणाच्याही लक्षात न येता सचिवांच्या गेटने





सहजपणे आतमध्ये शिरली. यानंतर ही महिला फडणवीसांच्या कार्यालयाबाहेर केली आणि त्याठिकाणी तोडफोड केली. या महिलेने कार्यालयाबाहेर देवेंद्र फडणवीसांची नेमप्लेट काढून फ ेकली आणि यानंतर घोषणाबाजी केली. ही महिला नक्की काय म्हणत होती, हे अद्याप समजू शकलेले नाही. ही महिला कोण होती, ती विनापास आतमध्ये कशी शिरली, या सर्व प्रश्नांची उत्तरे अद्याप मिळालेली नाही. मरिनड्राईव्ह पोलिसांनी सध्या या घटनेचा तपास सुरु केला आहे. त्यामुळे आता तपासातून काय निष्पन्न होणार, हे पाहावे लागेल.

मात्र, या मुद्द्यावरुन विरोधकांनी राज्य सरकारला कोंडीत पकडण्यास सुरुवात केली आहे. मंत्रालयातील गृहमंत्र्यांचेच कार्यालय सुरक्षित नाही, याबाबत टीका केली जात आहे. देवेंद्र फडणवीस हे स्वत:ला आधुनिक काळातील अभिमन्यू म्हणवून घेतात. पण त्यांना जवळच्याच लोकांपासून धोका आहे का, हे त्यांनी तपासून पाहावे, अशी प्रतिक्रिया ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी व्यक्त केली. तर भाजप नेते प्रवीण दरेकर आणि सुधीर मुनगंटीवार यांनी या घटनेबाबत चिंता व्यक्त करत पोलीस तपासात सगळ्या गोष्टी समोर येतील, असे सांगितले आहे. या सगळ्यामध्ये विधायक मार्गांनी आपण गोष्टी केल्या पाहिजेत. देवेंद्र फडणवीस लोकाभिमुख नेता आहे, त्यांच्याकडे लोकशाही पद्धतीने मागण्या मांडल्या पाहिजेत, असे भाजपचे प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी म्हटले.

## मंकीपॉक्स विषाणूच्या प्रादुर्भावाविषयी केंद्र सरकारकडून राज्ये व केंद्रशासित प्रदेशांना जनजागृतीसाठी सूचना

नवी दिल्ली : केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने मंकीपॉक्स विषाणूच्या संदर्भात सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना सजग राहण्याचे निर्देश दिले आहेत. भारतात मंकीपॉक्स क्लेड १बी चा नवीन रुग्ण आढळल्याने, भारत हा आफ्रिकेबाहेरील तिसरा देश ठरला आहे, ज्यात या प्रकारचा रुग्ण आढळला आहे.

२६ सप्टेंबर रोजी जारी केलेल्या निर्देशानुसार, केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण विभागाने मंकीपॉक्स संशयित रुग्णांना विलगीकरणात ठेवण्याचे निर्देश दिले आहेत. यासाठी रोग प्रतिबंधक उपाययोजना कडकपणे राबवण्याच्या सूचना दिल्या आहेत. चाचणीसाठी ठरवलेल्या प्रयोगशाळांची यादी देखील दिली आहे. जारी केलेल्या निर्देशामध्ये रुग्णालयीन व्यवस्थापन, रोग प्रतिबंधक उपाययोजना आणि जनजागृतीसाठी विशेष धोरणांचा समावेश केला आहे.

आरोग्य मंत्रालयाच्या मते, १४ ऑगस्ट रोजी जागतिक आरोग्य संघटनेने मंकीपॉक्स विषाणूच्या प्रादूर्भावाला आंतरराष्ट्रीय आरोग्य आणिबाणी म्हणून घोषित केले आहे. २००५च्या आंतरराष्ट्रीय आरोग्य नियमांनुसार भारत या घोषणेचा भाग आहे.

राज्य सरकारांना आरोग्य सुविधांमध्ये तयारीची तपासणी करण्याचे आदेश देण्यात आले असून, वरिष्ठ अधिकाऱ्यांनी राज्य व जिल्हा स्तरावर ही आढावा बैठक घेण्याबाबत निर्देश दिले आहेत.

मंकीपॉक्स क्लेड १ चे लक्षणे क्लेड २ सारखीच असली तरी, क्लेड १ मध्ये जटिलतांचा धोका अधिक असल्याचे आरोग्य मंत्रालयाने नमूद केले आहे.

## विकासासाठी झटणारे नेतृत्व गमावले


### मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची माजी मंत्री रोहिदास पाटील यांना श्रद्धांजली

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : राजकारण आणि समाजकारणाचा समतोल साधत राज्याच्या विकासासाठी झटणारे नेतृत्व म्हणून ज्येष्ठ नेते, माजी मंत्री रोहिदास पाटील सदैव स्मरणात राहतील, अशा शब्दांत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ज्येष्ठ नेते, माजी मंत्री रोहिदास पाटील यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे.

खानदेशच्या विकासाची तळमळ असणारा सुपुत्र महाराष्ट्राने गमावला आहे, असेही मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे.

'ज्येष्ठ नेते पाटील यांनी दाजीसाहेब म्हणून आदराचे स्थान मिळवले होते. वडीलांकडून राजकारण, समाजकारणाचा वारसा मिळालेल्या, उच्चशिक्षित अशा ज्येष्ठ नेते पाटील यांची वाटचाल सरपंच ते राज्याचे मंत्री अशी चढत्या आलेखाची राहीली आहे. विधानसभेचे ते दीर्घकाळ सदस्य राहीले होते. या काळात त्यांनी महत्वाच्या विविध खात्यांची जबाबदारी सांभाळली. कृषी, सहकार, सिंचन, ग्रामविकास, संसदीय कार्य अशा क्षेत्रांतील अभ्यास, अनुभवाचा उपयोग त्यांनी राज्याच्या विकासासाठी केला. ज्येष्ठ नेते पाटील यांच्या निधनामुळे राज्याच्या राजकारणातील ज्येष्ठ, मार्गदर्शक असे नेतृत्व गमावले आहे. त्यांच्या निधनामुळे झालेला आघात सहन करण्याची ताकद पाटील परिवाराला मिळावी, ही ईश्वरचरणी प्रार्थना. ज्येष्ठ नेते, माजी मंत्री रोहिदास पाटील यांना भावपूर्ण श्रद्धांजली, असे



ही मुख्यमंत्र्यांनी शोकसंदेशात म्हटले आहे.

# सिद्धार्थ खरात यांना मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## निवडणुकीपूर्वीच राजकीय वातावरण शिवसेनामय



दैनिक आपला विदर्भ

**मेहकर : उद्धव बाळासाहेब ठाकरे यांचे निकटवर्तीय तसेच युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांच्याशी घनिष्ठ मैत्रीचे संबंध असलेले उच्च विद्याविभूषित सिद्धार्थ खरात यांच्या नावाचे चर्चा मेहकर मतदार संघात भावी आमदार म्हणून निवडणुकीपूर्वीच होऊ लागली असून सिद्धार्थ खरात यांना मतदार संघातील सुशिक्षित वर्गासह ज्येष्ठ व युवा वर्गांकडून उस्फुर्त प्रतिसाद मिळत आहे. उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे इच्छुक उमेदवारांमध्ये सिद्धार्थ खरात यांचे नावाला प्रथम पसंती मिळत आहे. त्यामुळे सिद्धार्थ खरात यांची बाजु निवडणुकीपूर्वीच विरोधकांपेक्षा भारी दिसत दिसत असल्याचे चित्र मतदारसंघात दिसून येत आहे.**

विधानसभा निवडणुकी अवघ्या एक ते दीड महिन्यावर आली आहे. निवडणुकीपूर्वी मतदार संघात इच्छुक उमेदवारांच्या भेटीगाठी सुरू झाल्या आहेत. तर मतदार संघातील उच्चविद्याविभूषित तसेच मंत्रालत सचिव पदावर काम केलेले, तसेच सामाजिक व गोरगरिबांच्या समस्यांची जाण असलेले शिवसेनेचे नेते म्हणून सिद्धार्थ खरात यांच्याकडे पाहिले जात आहे. तर मतदार संघात इच्छुक उमेदवार तथा भावी आमदार म्हणून मतदार संघातील नागरिकांच्या नजरा आता सिद्धार्थ खरात यांच्याकडे लागल्या आहेत.

सिद्धार्थ खरात यांनी मंत्रालय सचिव पदावर काम करताना सर्वसामान्यांच्या कामाला प्रथम प्राधान्य देत त्यांच्या समस्या निकाली लावल्या आहेत. तसेच गत दोन महिन्यापासून त्यांनी मेहकर मतदारसंघतील नागरिकांच्या भेटीगाठी घेट त्यांच्या समस्या जाणून घेतल्या आहेत. नागरिकांच्या समस्या कशा निकाली काढता येतील याबाबतही त्यांनी नागरिकांची चर्चा केली आहे. मतदारसंघातील युवकांना शैक्षणिक सुविधा मिळाव्यात, मतदार संघात रोजगार निर्मिती व्हावी, शेतकऱ्यांना शेती करताना सुविधा उपलब्ध व्हाव्यात, त्यांच्या मालाला योग्य भाव मिळावा आदी अनेक समस्या बाबत चर्चा करून सदर समस्या सोडविण्याबाबत शासनदरबारी पाठपुरावा केला आहे.




त्यामुळे मतदार संघातील एक उच्चविद्याविभूषीत व सामाजिक कार्याची जाण असलेले गोरगरिबांच्या समस्या निकाली काढणारे व्यक्तिमत्व म्हणून सिद्धार्थ खरात यांना प्रथम पसंती मतदार राजाकडून आतापासून मिळत आहे.हे सिद्धार्थ खरात यांच्या भेटीगाठी तसेच छोट्या-मोठ्या कार्यक्रमाला मिळत असलेल्या उस्फूर्त प्रतिसादावरून दिसून येत आहे. सिद्धार्थ खरात यांनी मतदार संघ पिंजून काढला असून राजकीय नेते, सरपंच, गाव पुढारी यांच्या भेटी घेतल्या असता सर्वांनीच सिद्धार्थ खरात यांना प्रथम पसंती दिली असल्याचे दिसून येत आहे.

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे कट्टर शिवसैनिकांनी हा मतदारसंघ कायम शिवसेनेच्या खाती जमा करून या मतदार संघात शिवसेनेचा उमेदवार विजयी केला आहे. आता सुद्धा या मतदार संघाचे नेतृत्व हे अस्सल शिवसेनेच उमेदवार करीत असा विश्र्वास देत उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षाचे इच्छुक उमेदवार सिद्धार्थ खरात यांना तन-मन-धनाने सहकार्य करण्याची ही ग्वाही मतदार देत आहेत. तर भावी आमदार म्हणून सिद्धार्थ खरात यांच्याकडे मतदार वर्ग आतापासूनच पाहत आहेत.



**देविदास खनपटे**
मुख्य संपादक

### मतदार संघ शिवसेनेचा बालेकिल्ला

मेहकर मतदारसंघ हा गेल्या अनेक वर्षांपासून शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्यावर अपार श्रद्धा असलेल्या मतदारांनी शिवसेनेच्या खात्यात जमा केला आहे. त्यामुळे मेहकर मतदार संघ हा शिवसेनेचा बालेकिल्ला म्हणून संपूर्ण महाराष्ट्रात ओळखल्या जातो. गत दोन वर्षांपूर्वी शिवसेनेत निर्माण झालेल्या दुफळीनंतर शिवसेनेचे आमदार हे शिंदे गटात दाखल झाले आहेत. त्यामुळे या मतदार आता पुन्हा उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेला पसंती देत या मतदारसंघात शिवसेनेचीच मशाल पेटवतील अशी चर्चाही राजकीय वर्तुळात होत आहे. मतदार संघातील राजकीय वातावरण हे सुद्धा उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या बाजुनेच असल्याचे चित्र सर्वत्र दिसून येत आहे.



आदित्य ठाकरे यांच्यासमवेत सिद्धार्थ खरात.

CMYK

## दैवी स्वरांची देणगी लाभलेल्या लतादीदी

आपल्या मंजुळ आवाजाने संपूर्ण जगाला मोहिनी घालणारी भारताची गान कोकिळा भारतरत्न लता मंगेशकर यांची आज जयंती. लता मंगेशकर यांचा आवाज म्हणजे जगातील आठवे आश्र्चर्य होते. त्यांचा आवाज म्हणजे रसिकांसाठी मोठी पर्वणीच होती. लता मंगेशकर यांचा जन्म २८ सप्टेंबर १९२९ रोजी इंदूर येथे एका गोमंतकीय कुटुंबात झाला. लता दिदींना गायनाचा वारसा त्यांच्या वडिलांकडून मिळाला. त्यांचे वडील मास्टर दीनानाथ मंगेशकर हे शास्त्रीय गायक आणि नाट्य अभिनेते होते. त्यांच्या वडिलांकडूनच त्यांनी गायनाचे धडे गिरवले. तेच त्यांचे गायनातील पहिले गुरू होते. लता दिदींना लहानपणी हेमा नावाने हाक मारली जायची पण मास्टर दीनानाथ यांच्या एका नाटकातील नाव लतिका असे होते या नावावरूनच त्यांनी त्यांचे नाव लता असे ठेवले. हेच नाव आज जगातील आठवे आश्र्चर्य ठरले. आपल्या वडिलांच्या संगीत नाट्यात त्यांनी वयाच्या पाचव्या वर्षी काम केले. वयाच्या तेराव्या वर्षी लता दीदींनी गायन क्षेत्रात पाऊल ठेवले आणि १९४२ साली त्यांनी आपले पहिले गाणे रेकॉर्ड केले. किती हसाल ? या चित्रपटातील नाचू या गडे खेळू सारे..... हे गाणे त्यांनी गायले मात्र या गाण्याचा चित्रपटात समावेश झाला नाही. त्याचवर्षी मंगळागौर या चित्रपटात नटली चैत्राची नवलाई.... हे गाणे गायले. या चित्रपटात त्यांनी छोटीशी भूमिकाही केली होती. त्यानंतर त्यांनी काही मराठी चित्रपटात गाणी गायली. लता दिदींचे खूप गाजलेले पहिले गाणे म्हणजे १९४९ सालच्या महल चित्रपटातील खेमचंद प्रकाश या संगीतकाराने स्वरबद्ध केलेले आयेगा आनेवाला.... हे गाणे इतके लोकप्रिय झाले की त्यांच्याकडे संगीतकारांची रांग लागली. त्यांनी गायलेली गाणी लोकप्रिय होऊ लागली. १९५० नंतर दिदींचा उत्कर्षाचा काळ सुरू झाला. त्या काळातील नौशाद, सज्जाद, वसंत देसाई, दत्ता डावजेकर यासारखे जुने आणि त्या काळात उदयाला येणारे एस डी बर्मन, सी रामचंद्र, शंकर – जयकिशन, मदन – मोहन, उषा खन्ना, कल्याणजी – आनंदजी, रवी, लक्ष्मीकांत – प्यारेलाल, आर डी बर्मन अशा सर्वच संगीतकारांकडे दीदी गाऊ लागल्या. या सगळ्यांकडे गायलेल्या दिदींच्या गाण्याला अमाप लोकप्रियता मिळत गेली. त्यांच्या आवाजाने रसिक तृप्त होत गेले. १९६२ साली चीनने भारतावर आक्रमण केले. त्या युद्धात भारताचे शेकडो जवान धारातीर्थी पडले. या शहीद जवानांना श्रद्धांजली वाहण्यासाठी २७ जून १९६३ रोजी दिल्लीत एक समारंभ आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी एक खास गीत कवी प्रदीप यांनी लिहिले आणि सी. रामचंद्र यांनी संगीतबद्ध केले होते. ते गीत लता दीदींनी गायले. ते गीत आजही लोकप्रिय असलेले ये मेरे वतन के लोगो....... हे गीत ऐकून तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांना आपले आश्रू आवरता आले नाही. मराठीतही दीदींनी असंख्य गाणी गायली. आनंदघन या नावाने दीदींनी काही चित्रपटांना संगीतही दिले. जवळपास सात दशके आपल्या मंजुळ आवाजाने रसिकांना मंत्रमुग्ध करणाऱ्या लता दीदींनी जवळपास एक हजार चित्रपटातून ३० हजारांहून अधिक गाणी गायली. मराठी, हिंदीसह २० हुन अधिक प्रादेशिक भाषेत त्यांनी गाणी गायली. मधुबाला, नूतन, मीना कुमारी पासून श्रीदेवी, माधुरी, जुही ते काजोल, करिश्मा, करीना कपूरपर्यंत सर्व अभिनेत्रींना त्यांनी आवाज दिला. त्यांच्या गायन कलेची दखल घेऊन सरकारने त्यांना अनेक मानाचे पुरस्कार दिले. १९६९ साली भारत सरकारने त्यांना देशाचा सर्वोच्च तिसरा नागरी पुरस्कार पद्मभूषण देऊन गौरवले. १९९९ साली देशाचा सर्वोच्च दुसरा नागरी पुरस्कार पद्मविभूषणने गौरविण्यात आले. २००१ मध्ये त्यांना त्यांच्या संगीत क्षेत्रातील योगदानाबद्दल भारतरत्न या सर्वोच्च नागरी पुरस्काराने गौरविण्यात आले. एम. एस. सुब्बालक्ष्मी नंतर या पुरस्काराने गौरविण्यात आलेल्या त्या केवळ दुसऱ्या गायिका होत्या. त्यांना दादासाहेब फाळके हा चित्रपट सृष्टीतील सर्वोच्च पुरस्कार देखील मिळाला आहे. फ्रांस सरकारने ऑफिसर ऑफ लिजन ऑफ ऑनर या त्यांच्या सर्वोच्च नागरी पुरस्काराने त्यांना गौरविले आहे. लता दिदींना तीन वेळा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला तर चार वेळा फिल्मफेअरचा पुरस्कार मिळाला. फिल्मफेअर कडून त्यांचा दोनदा विशेष सन्मान करण्यात आला. कालांतराने त्यांनी नवीन गायकांना पुरस्कार मिळावा या हेतूने पुरस्कार स्वीकारणेच सोडून दिले. १९९२ साली महाराष्ट्र राज्य सरकारने लता मंगेशकर यांच्या नावाने पुरस्काराची सुरवात केली तर मध्यप्रदेश सरकारने १९८४ सालापासूनच लता मंगेशकर पुरस्कार देण्याची परंपरा सुरू केली. लता दिदींना अनेक विद्यापीठांनी मानाची डिलीट पदवी देऊन गौरविले. ६ फेब्रुवारी २०२२ रोजी वयाच्या ९२ व्या वर्षी वृद्धपकाळाने त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने संपूर्ण देश स्तब्ध झाला. त्यांच्या निधनाने केवळ भारतातच नव्हे तर जगभर हळहळ व्यक्त केली गेली. त्यांच्या निधनाने एका दैवी युगाचा अंत झाला असे मानलं गेले. लता दिदींशीवाय भारतीय चित्रपट सृष्टीचा आणि संगीत कलेचा इतिहास पूर्ण होऊ शकत नाही. आपल्या अलौकिक स्वरांनी चित्रपट सृष्टीवरच नव्हे तर संपूर्ण देशावर वेगळा ठसा उमटवणाऱ्या लता दिदींचे संगीत क्षेत्रातले योगदान पुढील १०० पिढ्यांना विसरता येणार नाही. जगभरातील कोट्यवधी संगीत प्रेमींच्या कानाला तृप्त करणारा दैवी स्वर आज हरपला असला तरी त्यांच्या आवाजाच्या परिसस्पर्शाने अजरामर झालेल्या गीतांच्या माध्यमातून हा स्वर अनंतकाळ आपल्या मनामध्ये गुंजन करत राहणार आहे. दैवी स्वरांची देणगी लाभलेल्या गान कोकिळा भारतरत्न लता मंगेशकर यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

# चान्नी पोलिसांची वरली मटका अड्ड्यावर धाड

## मळसुर येथे दोघांना रंगेहाथ पकडले

दैनिक आपला विदर्भ

नासीर शेख

**पातूर :** पातुर तालुक्यातील चान्नी पोलीस स्टेशन अंतर्गत मळसूर येथे सोपीनाथ महाराज कमानजवळ वरली मटका अड्डा सुरू असल्याची गुप्त माहिती मिळताच चान्नी पोलीस स्टेशनचे ठाणेदार रवींद्र लांडे यांनी आपले




सहकारी सुनील भाकरे ,पवन चव्हाण, विनोद वांडे, ललित दामोदर, यांच्यासाह शुक्रवार दि.२७ सप्टेंबर रोजीच्या दुपारी सापळा रचवून धाड टाकली असता, वरली मटका अड्डा सुरू असल्याच्या ठिकाणाहून लोकांची पळापळ झाली, वरली मटका खायवळ घेणाऱ्यांनी सुद्धा पळ काढला मात्र पोलिसांनी दोन जणांना रंगेहात पकडले त्यांच्याजवळून वरली मटका चालविण्यासाठी वापरण्यात आलेले साहित्य व रोख असा मुद्देमाल जप्त केला असून, आरोपी कैलास जगदीश राठोड मळसुर, समाधान वासुदेव समुद्रवार, देऊळगाव साकर्शा ता.मेहकर या दोघांना अटक करून त्यांचेविरुद्ध महाराष्ट्र जुगार अधिनियम अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास चान्नी पोलीस स्टेशनचे ठाणेदार रवींद्र लांडे करीत आहे.

> मळसूर येथे सोपीनाथ महाराज कमानजवळ पैशाची हारजीत करून वरली मटका सुरू असल्याची गुप्त माहिती मिळताच सापळा रचवुन दोघांना रंगेहाथ पकडून कारवाई केली आहे.
> **–रवींद्र लांडे**
> **ठाणेदार पोलीस स्टेशन चान्नी**

## लपून छपून डेटीं ॲप्स वापरतात हे बॉलिवूड स्टार्स, उर्वशी रौतेलाचा मोठा खुलासा!

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** बॉलिवूडची ग्लॅमरस गर्ल उर्वशी रौतेला सतत चर्चेत असते. सोशल मीडियावरही ती भरपूर सक्रिय असून चाहत्यांशी संवाद साधत असते. नुकत्याच एका मुलाखतीमध्ये तिनं डेटिंग प्स वापरण्याविषयी खुलासा केला. एवढंच नाही तर तिने कोणकोणते बॉलिवूड स्टार्स डेटिंग प्स वापरतात याविषयीही खुलासा केला.

उर्वशी रौतेलाने ती डेटिंग प्स वापरते सांगितलं. सोबतच तिनं आणखी कोणते स्टार हे प्स वापरतात याचा खुलासा केला. उर्वशी म्हणाली, स्टार्स आपली ओळख लपवून डेटिंग प वापरतात.

या लिस्टमध्ये ऋतिक रोशनचं नाव आहे. सध्या ऋतिक सबा आझादला डेट करत आहे. मात्र तरीही तो डेटिंग प्सवर आहे. या लिस्टमध्ये जान्हवी कपूरचंही नाव आहे. बॉयफ्रेंड असूनही ती डेटिंग प वापरते हे जाणून तिच्या चाहत्यांना तर मोठा धक्काच बसला असेल. आदित्य रॉय कपूरही डेटिंग पवर आहे. नुकतंच त्याचं अनन्या पांडेसोबत ब्रेकअप झालं आहे. उर्वशीने आदित्यचंही नाव या लिस्टमध्ये घेतलं.

वाणी कपूरचंही नाव उर्वशीने घेतलं. ''तीदेखील प्रेम शोधत आहे.'' अर्जुन कपूरदेखील डेटिंग पवर आहे. मलायका अरोरासोबत नुकतंच त्याचं ब्रेकअप झालं आहे. अर्जुनही रिकाम्या वेळेत डेटिंग प वापरतो. नेहा शर्माही डेटिंग पवर आहे. सोनल चौहान वेळ घालवण्यासाठी डेटिंग पचा वापर करते.

## सोशल मीडियावर लोक शरीरसुखाची मागणी करतात, १६ वर्षाच्या मुलीवर चौघांचा अत्याचार व्हिडीओ केला व्हायरल

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** महिलांवरील वाढते अत्याचार थांबवण्यासाठी प्रशासन कठोरातील कठोर पावले उचलण्यासाठी प्रयत्नशील असतानाच काही हादरवणाऱ्या घटना समोर आल्या आहेत. महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुण्यातील गुन्हेगारी कृत्यांमध्ये आता आणखी एका गंभीर प्रकरणाची भर पडली आहे. जिथे, चौघांकडून एका अल्पवयीन मुलीवर अत्याचार करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.



पुण्यातील एका म हाविद्यालयातील मुलांनी अल्पवयीन मुलीवर करण्यात लैंगिक अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. जनजागृती दरम्यान पोलिसांच्या समुपदेशनपर कार्यशाळेदरम्यान हा प्रकार उघडकीस आल्याचं सांगितलं जात आहे. सदर धक्कादायक प्रकार समोर येताच याप्रकरणी पुण्यातील कोरेगाव पार्क पोलीस ठाण्यात पॉक्सो कायद्यान्वये चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. तर, पोलिसांनी दोन आरोपींना अटक केली असून, अन्य दोन अल्पवयीन मुलांना ताब्यात घेण्यात आले आहे.

... त्यांनी व्हिडीओ व्हायरल केला

पुण्यातील उच्चभ्रू परिसर समजल्या जाणाऱ्या कोरेगाव पार्क परिसरात एका १६ वर्षीय मुलीवर तिच्याच ओळखीच्या ४ मुलांनी सामूहिक बलात्कार केल्याचा प्रकार उघडकीस आला. या मुलीवर अत्याचार करून तिचे आक्षेपार्ह फोटो सोशल मीडियावर व्हायरल करत तिची बदनामीही करण्यात आली. याप्रकरणी पीडित मुलीने दोन सज्ञान आणि दोन अल्पवयीन आरोपींविरोधात कोरेगाव पार्क पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

ओम घोलप (२०), स्वप्निल गाडेकर (२०) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावं असून दोन आरोपी अल्पवयीन असल्याचं सांगण्यात येत आहे. पोलिसांनीच्या माहितीनुसार आरोपींनी एप्रिल २०२४ ते १२ सप्टेंबरदरम्यानच्या काळात या मुलीसोबत बळजबरीनं शारीरिक संबंध ठेवले. या घटनेचे व्हिडिओ काढून तसेच दुसऱ्या अल्पवयीन मुलाने पीडित मुलीचे अर्धनग्न फोटो आणि व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी तिला दिली. आरोपींनी या मुलीवर वारंवार वेगवेगळ्या ठिकाणी वारंवार अत्याचार केले, तिचे व्हिडीओही व्हायरल केले. ज्यामुळं अनेक अनोळखी लोकांनी तिला मेसेज करत शारीरिक सुखाची मागणी केल्याची धक्कादायक बाब मुलीनं तक्रारीत नमुद केली.

## आदित्य ठाकरेंचा एकेकाळचा खास मित्र एकनाथ शिंदेंसाठी उत्साहाने मैदानात उतरला

### धर्मवीर २ चित्रपट पाहायला शिवसैनिकांची प्रचंड गर्दी

दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी :** धर्मवीर चित्रपटाच्या पहिल्या भागाच्या यशानंतर 'धर्मवीर २'ची सर्वानाच उत्सुकता सर्वानाच लागली. हा चित्रपट ९ ऑगस्ट २०२४ रोजी प्रदर्शित होणार होता. म ात्र, त्यावेळी महाराष्ट्रात अनेक ठिकाणी अतिवृष्टी झाली होती. त्यामुळे या चित्रपटाचं प्रदर्शन पुढे ढकलण्यात आलं होतं. मात्र आता या चित्रपटाची प्रतीक्षा संपली असून अखेर धर्मवीर २ प्रेक्षकांच्या भेटीस आला आहे. आज पहिल्याच दिवशी हा चित्रपट पाहण्यासाठी राज्यभरात शिवसैनिकांची मोठी गर्दी उसळल्याचे दिसून येत आहे. तर या चित्रपटाच्या निमित्ताने युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांचा एकेकाळचे खास मित्र राहुल कनाल हे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासाठी आता मैदानात उतरल्याचे पाहायला मिळाले.

नाशिकच्या चित्रपटगृहातदेखील शिवसैनिकांची मोठी रीघ पाहायला मिळाली. ढोल ताशांच्या गजरात आणि फटाक्यांच्या आतषबाजीत शिवसैनिक चित्रपट गृहात दाखल झाले. यावेळी शिंदे सेनेच्या सोशल मीडियाचे राज्यप्रमुख राहुल कनाल, शिवसेना उपनेते अजय बोरस्ते यांच्यासह पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे यांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात आले. शिवसेना शिंदे गटाकडून धर्मवीर २ हा चित्रपट मोफत दाखविला जात आहे.

काय म्हणाले राहुल कनाल?

यावेळी राहुल कनाल म्हणाले की, या चित्रपटातून युवा समाजाला एक शिकवण मिळावी. विरोधक महाराष्ट्रात जे फेक नरेटीव्ह पसरवत आहेत. त्याच्यासाठी या चित्रपटात एक उत्तम लाईन आहे ती म्हणजे 'चुकीला माफी नाही', असे त्यांनी यावेळी सांगितले. दरम्यान, चित्रपट सुरु होण्याआधी



शिवसैनिकांनी मोठा जल्लोष केल्याचे पाहायला मिळाले.

यावेळी अजय बोरस्ते म्हणाले की, ज्या चित्रपटाची आम्ही सर्वजण वाट बघत होतो, प्रतीक्षा करत होतो तो क्षण आलेला आहे. माननीय हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे म्हणजे हिंदुत्वाचं दुसरं नाव. त्यांचाच वारसा ज्यांनी चालवला ते आदरणीय दिघे साहेब. त्यांच्या जीवनपटावर असलेला हा चित्रपट आहे. दिघे साहेब हे वाघ होते. दिघे साहेबांची कार्यशैली जर आज कुठे दिसत असेल तर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेबांमध्ये दिसते. धर्मवीर २ हा चित्रपट एक वेगळी ऊर्जा सर्व शिवसैनिकांमध्ये निम ाण करेल, असे त्यांनी यावेळी सांगितले.

## ३ ऑक्टोबरपासून होणार नवरात्रीला सुरुवात? जाणून घ्या ९ दिवस काय करावे आणि काय करू नये?

सध्या महाराष्ट्रात अनेक सण उत्सव चालू झालेले आहे. गणपती संपल्यानंतर मग आता सर्वत्र नवरात्रीचे धामधूम चालू झालेली आहे. हिंदू कॅलेंडरनुसार आश्रि्वन महिन्याच्या शुक्ल पक्षाच्या प्रतिपदा तिथी पासून नवरात्री या सणाला सुरुवात होते. त्यामुळे यावर्षी ही शारदीय नवरात्र गुरुवारी म्हणजेच ३ ऑक्टोबर २०२४ पासून सुरु होणार आहे. हिंदू धर्मानुसार नवरात्रीच्या या नऊ दिवसांमध्ये दुर्गा देवीच्या नऊ वेगवेगळ्या रूपांची पूजा केली जाते. यावेळी तिच्या जागर केला जातो.

हिंदू पुराणानुसार असे मानले जाते की, नवरात्रीच्या या नऊ दिवसांमध्ये दुर्गामाता ही पृथ्वीवर निवास करत असते. आणि तिच्या भक्तांचे रक्षण करत असते. त्यामुळे नवरात्रीचे हे नऊ दिवस खूप पवित्र असतात. अनेक लोक या नऊ दिवसांमध्ये कडक उपवास




करतात. असे म्हणतात की, दुर्गा माता पृथ्वीवर असल्याने भक्तांच्या इच्छा पूर्ण करत असते. परंतु जरी तुम्हाला उपवास करणे, शक्य नसेल तर या नऊ दिवसांमध्ये काही गोष्टी करणे टाळा. तसेच कोणत्या गोष्टी केल्याने काही गोष्टी केल्याने नवरात्रीच्या उपासनेचे तुम्हाला फळ मिळते. हे आज आपण जाणून घेऊया.

**नवरात्र कधीपासून सुरू होत आहे ?**

पंचांगानुसार दरवर्षी अश्रि्वन महिन्याच्या शुक्ल पक्षातील प्रतिपदा या तिथीला नवरात्रीला सुरुवात होते. यावर्षीही तिथे ३ ऑक्टोबर रोजी येत आहे. ही तिथी ३ ऑक्टोबर रोजी पहाटे १२:१९ पासून सुरु होईल. तर दुसऱ्या दिवशी ४ ऑक्टोबर रोजी पहाटे २ वाजून ५८ पर्यंत समाप्त होईल. ३ तारखेला सुरू झालेला, हा उत्सव शनिवारी १२ ऑक्टोबर रोजी संपणार आहे.

**नवरात्रीत कोणत्या गोष्टी करायला पाहिजे.**

दुर्गा मातेला लाल रंग खूप आवडतो. त्यामुळे तुम्ही या नवरात्रीच्या दिवसांमध्ये देवीला लाल रंगाची फुले अर्पण करू शकतात. तसेच लाल रंगाचे कपडे देखील अर्पण करू शकता. लाल रंग हा समृद्धी नशीब आणि शक्ती तसेच प्रेमाचे प्रतीक मानले जाते.

नवरात्रीच्या दिवसांमध्ये दुर्गा देवीच्या विविध रूपांची पूजा करा आणि दुर्गा मातेला दररोज नवीन फुले फळे आणि मिठाई अर्पण करा.

नवरात्रीमध्ये तुम्ही दुर्गादेवीच्या मंत्राचा जप करू शकता. आणि ध्यान देखील करू शकता यामुळे तुमची मनशांती वाढेल एकाग्रता वाढते आणि तुमचे कुटुंब आनंदात राहते.

ज्या दिवसांमध्ये तुम्ही गरजूंना दान देऊ शकता. तसेच सेवा करू शकता. हे एक महत्त्वपूर्ण कृत्य मानले जाते. असे केल्यास तुम्हाला चांगले फळ मिळते.

**शारदीय नवरात्रात या गोष्टी करू नये**

नवरात्रीच्या या दिवसांमध्ये अखंड ज्योत पेटवणे खूप चांगले मानले जाते. जर तुम्ही अखंड ज्योत लावत असाल, तर घर कधीही रिकामी ठेवू नका. अखंड ज्योत विजू देऊ नका.

नवरात्रीच्या या दिवसांमध्ये तुम्ही तामसिक अन्न तसेच मद्याचे सेवन करू नका.

या दिवसांमध्ये तुम्ही नकारात्मकते पासून दूर राहा आणि चांगले विचारांचा स्वीकार करा. कोणत्याही प्रकारचे वाद घालू नका भांडण करू नका.

नवरात्रीची पूजा करताना शिस्त खूप महत्त्वाची आहे. नवरात्रीच्या काळात तुम्ही वेळेवर उठणे देवीची भक्ती भावाने पूजा करणे खूप गरजेचे आहे. असे केल्याने तुम्हाला नक्कीच देवीचा आशीर्वाद लाभेल.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्धर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### बनावट नोटा छापणाऱ्या बंटी-बबलीला पोलिसांनी ठोकल्या बेड्या




दैनिक आपला विदर्भ

**नवी मुंबई/प्रतिनिधी** : नवी मुंबईतील रबाळे एमआयडीसी पोलिस स्टेशनच्या हद्दीत एका लॉजवर राहणाऱ्या दोन जणांना त्यात एक महिला आणि एका पुरुषाचा समावेश आहे या दोघांना गुप्त माहितीच्या आधारे संशयित म्हणून ताब्यात घेतले असता, धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. दोघांकडून १२ मोबाईल, २ लॅपटॉप आणि ८१ हजारांच्या बनावट नोटा त्याच प्रमाणे ७० हजारांची रोख रक्कम ,एक होंडासिटी कार जप्त केली आहे. हे दोघे अंदाजे मागील एक वर्षापासून बनावट नोटा छपाई करत असून अनेकांना गंडा घातल्याचे समोर आले आहे. आरोपी विवेककुमार प्रेमबाबु पीपल आणि अश्विनी सरोवदे हे दोघेही भाड्याने लॉज वर राहत आसल्याने तेथील काही जणांना त्यांच्या हालचालींवर संशय आल्याने संबधित प्रकार पोलिसांना सांगताच पोलिसांनी दोघांनाही चौकशीसाठी ताब्यात घेतले होते. त्यावेळी हे बनावट नोटा प्रकरण समोर आले आहे. दोघांनाही अटक केली असून, रबाळे एमआयडीसी पोलीस अधिक तपास करत आहेत. पोलिसांनी आर्थिक गुप्तवार्ता पथक नवी मुंबई यांनी नवी मुंबई पोलीस आयुक्तालय हद्दीत राहणाऱ्या सर्व नागरिकांना आपल्या आजूबाजूच्या परिसरात आर्थिक स्वरूपाचे गुन्हे घडत असल्यास तुम्ही तात्काळ पोलिसांशी संपर्क करून माहिती द्यावी असे आवाहन केले आहे.

### ओबीसी, एससी, एसटी समन्वय समिती नांदेड जिल्ह्याच्यावतीने शरद पवार यांचा जाहीर निषेध




दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी** :मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळावे यासाठी मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा उपोषण सुरु केले होते. मात्र नवव्या दिवशी त्यांची तब्येत खालावल्याने त्यांनी उपोषण स्थगित केले आहे. शरद पवार यांनी मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी केलेल्या मागणीला पाठिंबा दिल्याने ओबीसी,एससी,एसटी समाज आक्रमक झाला आहे. आज शरद पवार यांचा ओबीसी,एससी,एसटी समाजाच्या वतीने जाहीर निषेध करण्यात आला आहे. तसेच महाविकास आघाडीतील इतर पक्ष म्हणजे शिवसेना ठाकरे गट, काँग्रेस यांनी आपली भूमिका स्पष्ट करावी अशी मागणी यावेळी करण्यात आली. शरद पवार व महाविकास आघाडीने करोडे ओबीसी बांधवांच्या मुलांच्या भविष्यावर पाय देऊन शरद पवार यांनी मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या मागणीला पाठिंबा दिला असल्याची प्रतिक्रिया यावेळी लिंगायत समितीचे समन्वयक अविनाश भोसीकर यांनी दिली आहे.

### अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे सर्वेक्षण करावे यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा



दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी** :नांदेड जिल्ह्यासह शहरात दिनांक ३१ ऑगस्ट ते ३ सप्टेंबर या दरम्यान अतिवृष्टी झाली होती. अतिवृष्टीमुळे शहरातील प्रभाग क्रमांक ७ मधील जयभीमनगर सह श्रावस्तीनगर, माळटेकडी, देगाव चाळ, भीमघाट, नावघाट, सांगवी, चौफाळा, अंबानगर, गोपाळनगर, खडकपुरा, राजनगर, नागसेन नगर यासह शहरातील नदीकाठच्या सखल भागात नागरी वस्ती मध्ये नागरीकांच्या घरात पाणी शिरून मोठे नुकसान झाले होते. सदरील भागातील नुकसानग्रस्त घराचे सर्वेक्षण महानगरपालिकेकडून सुरू असतानाच अचानक थांबविण्यात आले असून राहिलेल्या भागाचे सर्वेक्षण करून त्यांना मदत देण्यात यावी. या मागणीसाठी आज राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हा शहर सरचिटणीस प्रविण घुले यांच्या नेतृत्वात जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा काढण्यात आला होता. या मोर्चात गौतम भद्रे राष्ट्रवादी कामगार आघाडी शहर जिल्हा अध्यक्ष यांच्यासह हजारो नागरिकांची उपस्थिती होती.

# महावितरणच्या भोंगळ कारभाराबाबत नागरिकांच्या दैनिक 'आपला विदर्भ'कडे तक्रारी वाढल्या

दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी** : महावितरणच्या भोंगळ कारभारासंदर्भात दैनिक आपला विदर्भाने दि. २७ सप्टेंबर २०२४ रोजी महावितरणचा भोंगळ कारभार नागरिकांचा जीव धोक्यात या मथळ्याखाली बातमी प्रकाशित होताच. नागरिकांनी महावितरण संदर्भात असलेल्या समस्या दैनिक आपला विदर्भांशी संपर्क साधून मांडून आमच्याही समस्यांना वाचा फोडून न्याय देण्यासाठी पाठपुरावा करा, अशी विनंती केली. दैनिक आपला विदर्भमध्ये दि.२७ सप्टेंबर रोजी महावितरणचा भोंगळ कारभार नागरिकांचा जीव धोक्यात या मथळ्याखाली वृत्त प्रकाशित करून नागरिकांच्या महावितरण कंपनीसंदर्भात असलेल्या समस्यांना वाचा फोडली होती. दैनिक आपला विदर्भमध्ये यापूर्वी प्रकाशित झालेल्या बातम्यामुळे अनेक समस्या निकाली लागून नागरिकांचा त्रास दूर झाला आहे. त्यामुळे दैनिक आपला विदर्भाचे नागरिकांकडून कौतुकही करण्यात आले आहे.






### महावितरण कर्मचाऱ्यांना कामाचा विसर

डोणगाव येथील वार्ड नं. ४ येथील शेलगाव पार परिसरातील बहुसंख्य वस्ती असलेल्या ठिकाणी करीम अली शहा रोहित्र हे पूर्णतः जमिनीवर आहे. या रोहित्राच्या आजुबाजुला घरे व गुरांचे गोठे आहेत व रोहित्र लगत पाण्याची डबके साचलेले आहे. थोडाही पाऊस आला तर या रोहित्राच्या बॉक्समध्ये पाणी जाऊन वारंवार फेज जातात. शॉर्टसर्किट होऊन रोहित्रात जाळ देखील होतो. येथील नागरिक हे जीव मुठीत ठेऊन या ठिकाणी वास्तव्य करीत असून कधी काय होईल याची ध्यास्ती या नागरिकांना कायम लागलेली असते. तर एखाद्या वेळेला विद्युत रोहित्रात पाणी जाऊन शॉर्टसर्किट झाला तर येथील सर्व घरांना व गोठयांना विद्युत प्रवाह येऊन अनुचित घटना घडण्याचीही भिती निर्माण झाली आहे.तर या हानीस जबाबदार कोण असा प्रश्न नागरिकांनी उपस्थित करून महावितरणने नागरिकांच्या जिवाशी सुरू असलेला खेळ थांबवाव, अशी मागणी केली आहे.

महावितरण संदर्भात असलेल्या समस्याबाबत आता नागरिकांनी दैनिक आपला विदर्भकडे तक्रारी करून आमच्याही वार्डातील समस्यांना वाचा फोडून समस्या निकाली काढण्यासाठी पाठपुरावा करण्याची मागणी केली. तर नागरिकांनी आमच्या परिसरातील रोहित्र हे जमिनीला टेकलेले आहे. आमच्याही जीवाला धोका निर्माण झाला आहे, अशा प्रतिक्रिया व्यक्त केल्या. तर, शेलगाव पार परिसरातील नागरिक संतप्त होत महावितरणचे रोहित्र थेट जमिनीवर असल्याची आपबिती कथन करून या रोहित्रामुळे जवळील टिन शेडच्या घराना धोका निर्माण झाला असल्याच्या प्रतिक्रिया व्यक्त करीत सदर समस्या सोडविण्याबाबत आपण पाठपुरावा करण्याची मागणी केली.

### पतीकडून पत्नीवर ॲसिड फेकल्याची भयानक घटना; आरोपी फरार

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** :मालवणी येथे एका महिलेच्या पतीने तिच्या चेहऱ्यावर ॲसिड फेकल्याची भयानक घटना घडली आहे. या हल्लयात पीडित महिला गंभीर जखमी झाली असून तिला उपचारांसाठी कूपर रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. यामुळे प्रचंडखळबळ माजली आहे. पीडित महिलेच्या तक्रारीवरून तिच्या पतीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिस त्याचा शोध घेत आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, पीडित महिला अवघी २७ वर्षांची असून ती मालवणी येथे राहते. २०१९ मध्ये तिचा प्रेमविवाह झाला. मात्र तिचा पती सध्या बेरोजगार असू त्याला अमली पदार्थ सेवन करण्याचे व्यसन आहे. एवढंच नव्हे तर त्या इसमाचे एका तृतीयपंथियाशी प्रेमसंबंध आहेत, असे त्या महिलेला समजले होते. या सगळ्या मुद्यावरून त्यांच्यात नेहमीत भांडण व्हायचं. अखेर त्या महिलेने पतीपासून विभक्त होण्याचा निर्णय घेतला.

## अवकाळी पावसाचा तडाखा, सोयाबीन पिके पाण्याखाली; शेतकरी हवालदिल

दैनिक आपला विदर्भ


**अहमदनगर/प्रतिनिधी** : सध्या सर्वत्र सोयाबीन पिके काढण्याचं काम जोरात सुरू आहे. यंदा चांगलं उत्पन्न मिळेल असे शेतकऱ्याला वाटत असतानाच परतीच्या अवकाळी पावसाने काढलेली सोयाबीन पिक देखील आता भिजून चालल्याने तसेच शेतामध्ये उभे असलेले सोयाबीन यामध्ये देखील पाणी साचल्याने शेतकरी हवालदिलं झाला आहे. संगमनेर तालुक्यातील तळेगाव दिघे परिसरातील शेतकरी विजय कारभारी दिघे, किशोर कारभारी दिघे यांच्या तळेगाव दिघे जूनेगाव हद्दीतील सोयाबीन पिकाचे नुकसान झाले असून लाखो रुपयांची सोयाबीन पाण्यात गेल्याचे चित्र एकंदरीत दिसत आहे. तसेच परिसरातील काही शेतकऱ्यांचा देखील सोयाबीन पिके पाण्याखाली गेले. त्यामुळे प्रशासनाने तात्काळ पंचनामा करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी शेतकऱ्यांच्या वतीने विजय कारभारी दिघे व भाऊसाहेब कारभारी दिघे यांनी केले आहे.सदर शेतकरी यांनी गावाचे कामगार तलाठी शिरसाठ यांना पंचनामा करण्याची विनंती केली असता त्यांनी मात्र टाळाटाळ केली.त्यामूळे शेतकरी हतबल झाला आहे.



## बांगलादेशातील लोकप्रिय पॉर्न स्टार आरोही बर्डे उर्फ बन्ना शेख हिला उल्हासनगर पोलिसांनी केली अटक

दैनिक आपला विदर्भ

**उल्हासनगर/प्रतिनिधी** : अंबरनाथ मधील नेवाळा नाका येथे साईराज सोसायटी चाळ या ठिकाणी एक बांगलादेशी महिला राहत असल्याची पोलिसांना माहिती मिळाली होती. हि माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी सविस्तर चौकशी केली असता एका महिलेने बनावट कागदपत्रे बनवली असल्याचे निदर्शनास आले. अरविंद बर्डे हे अमरावतीचे रहिवासी आहेत. बांगलादेशवरुन आपल्या तीन मुलांसहित आलेल्या या महिलेशी अरविंद बर्डे यांनी लग्न केले. त्यानंतर कुठलीही माहिती नसताना अरविंद बर्डे यांनी त्या महिलेची व तिच्या मुलांची बनावट कागदपत्रे तयार केली. आधारकार्ड, पॅन कार्ड व इतर कागदपत्रे बनवून पासपोर्ट बनवले. या महिलेच्या तिन्ही मुलांच्या जन्म ठिकाणाचा कोणताही पुरावा नाही आहे. यातील अरविंद बर्डे, अंजली बर्डे व त्यांचा मुलगा रविंद्र बर्डे हे कतारला गेले आहेत तर त्यांची दुसरी मुलगी रिया बर्डे यांची बहिण रितू बर्डे हिचा शोध पोलीस घेत आहेत. यातील रिया बर्डे हिला आरोही बर्डे व बन्ना शेख या नावाने देखील ओळखले जायचे. रिया हिच्या आई अंजलीचे नाव रुबी शेख, वडील अरविंद बर्डे, भाऊ रवींद्र उर्फ रियाज शेख आणि बहीण रितू उर्फ मोनी शेख आहे. काल हिललाईन पोलीस स्टेशनला बनावट कागदपत्रांवर भारतीय पासपोर्ट बनवल्याबद्दल खझउ ४२०, ४६५, ४६८, ४७९, ३४ आणि १४ अ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस करत आहेत. यातील रिया बर्डे उर्फ बन्ना शेख ही पॉर्न व्हिडीओज मध्ये काम करायची व तिच्या वेबसाईट्स देखील आहेत अशी माहिती प्राप्त झाली आहे याचा शोध सुरु आहे अशी माहिती पोलिसांनी दिली आहे.





### जि.प प्राथमिक शाळा चौकूळ नं. ४ चे विद्यार्थी बनले पर्यटकांचे गाईड; तीन भाषेत मुलांनी दिली पर्यटकांना माहिती

दैनिक आपला विदर्भ



**सिंधुदुर्ग/प्रतिनिधी** : आज जागतिक पर्यटन दिना निमित्त शालेय विद्यार्थ्यांना पर्यटन आणि पर्यटन स्थळांची माहिती व्हावी यासाठी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चौकूळ नं. ४ या शाळेचे शिक्षक जावेद तांबोळी यांनी सर्व विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष पर्यटन स्थळी घेऊन जात त्यांना पर्यटनाचे महत्त्व सांगितले आहे. आज शिक्षक जावेद तांबोळी विद्यार्थ्यांना आंबोलीतील धबाधब्यावर घेऊन गेले होते. राज्यातील सर्वात थंड हवेचे ठिकाण म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आंबोलीचं सौंदर्य पाहण्यासाठी देशभरातून पर्यटक येथे येत असतात. यावेळी हे विद्यार्थी पर्यटकांचे गाईड बनले होते. या विद्यार्थ्यांनी पर्यटकांना पर्यटन स्थळाबद्दल माहिती दिली आहे. या जिल्हा परिषदेच्या मुलांचे बोलणं पाहून परदेशी पर्यटकांना सुद्धा आश्र्चर्य वाटले तर त्यांनी विद्यार्थ्यांसोबत फोटो देखील काढले आहेत. जावेद तांबोळी या शिक्षकाने मुलांना अभ्यासात गोडी निर्माण व्हावी, त्यांचा सर्वगुणसंपन्न विकास व्हावा यासाठी विविध उपक्रम राबवत असतात.

## नागरे महाविद्यालयात संपन्न झाल्या विद्यापीठस्तरीय अंतर महाविद्यालयीन मुलींच्या कबड्डी स्पर्धा

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बिबी** : सिंदखेड राजा तालुक्यातील दुसरबीड येथे अंतर महाविद्यालयीन मुलींच्या कबड्डी स्पर्धांचे आयोजन नारायणराव नागरे महाविद्यालयात करण्यात आले होते.

मुलींच्या संघाची सर्वप्रथमता नोंदणी करण्यात आली होती.

ग्रामीण भागामध्ये साहसी खेळाची वृत्ती निर्माण व्हावी या अनुषंगाने कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

सदरील स्पर्धेमध्ये संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अंतर्गत येणाऱ्या अकोला अमरावती यवतमाळ बुलढाणा व वाशिम अशा पाच जिल्ह्यातून महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी सहभाग नोंदविला होता.

या स्पर्धेचे आयोजन दिनांक २३ सप्टेंबर २०२४ ते २७ सप्टेंबर २०२४ यादरम्यान करण्यात आले होते.

यावेळी मुलींची स्वतंद्र्य सुसज्ज विश्रांती व भोजन व्यवस्था नारायणराव नागरे महाविद्यालयाच्या वतीने करण्यात आली होती.

या कबड्डी स्पर्धेचे उद्घाटन संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावतीचे अधिसभा सदस्य प्रा. संतोष कुटे व अधीसभा व्यवस्थापन सदस्य तथा प्राचार्य डॉ.विजय नागरे यांच्या शुभहस्ते उदघाटन करण्यात आले. या विद्यापीठ स्तरीय स्पर्धा ग्रामीण भागातील अतिशय दुर्गम भागातील महाविद्यालयाला या स्पर्धेचे आयोजन करण्याचे भाग्य लाभले त्याबद्दल डॉ. विजय नागरे यांनी मा. कुलगुरू डॉ. मिलिंद बारहात्ते यांचे व शारीरिक शिक्षण विभाग संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ यांचे आभार मानले.



या स्पर्धेत सहभागी झालेल्या ब गटातून विजेता संघ हा अ गटातील विजेता संघासोबत अमरावती खेळून त्यातील विजेता संघ हा राज्यस्तरीय विद्यापीठ स्पर्धे करिता जाईल असे आयोजक डॉ. विजय नागरे यांनी सांगितले. अंतिम सामना गुलाब नबी आझाद बार्शीटाकळी व सीताबाई महाविद्यालय अकोला यांच्यामध्ये होऊन गुलाब नबी आझाद संघ बार्शीटाकळी ब गटातून विजयी झाला व अ गटासोबत अंतिम सामना अमरावती विद्यापीठ येथे खेळून यातील विजेता संघ हा राज्य पातळीवर विद्यापीठस्तरीय स्पर्धेकरिता पात्र होईल ब गटातील विजेता व उपविजेता संघाला भगवान बाबा शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव श्री शिवराज कायंदे यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले व प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करण्यात आला तसेच पुढील स्पर्धे करिता शुभेच्छा देण्यात आल्या. स्पर्धा यशस्वी होण्याकरिता नारायणराव नागरे महाविद्यालय शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख प्राध्यापक सर्जेराव वाघ व प्राध्यापक शेख युनूस यांनी परिश्रम घेतले.

सदरील कबड्डी स्पर्धेत परीक्षक म्हणून प्रा. डाबरे, प्राध्यापिका खडसे, प्राध्यापिका जाधव, श्री. जी एस देशमुख, प्रल्हाद नागरे, श्री. भोसले,प्रा.मनोज व्यवहारे,प्रा. ठोंबल प्रा. गणेश घुगे, प्रा. देशमाने,प्रा. देवानंद नागरे, शेख वसीम, प्रा. गजानन राठोड, प्रा. नयना गवारे, या निर्णयामुळे श्री अनिल गायकवाड श्री गजानन मुंडे श्री धीरज गुंजाळ यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

## विविध वृत्त...

### उमेदचा स्वतंत्र विभाग तयार करावा या मागणीसाठी हजारो महिलांनी काढला जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** शासनाच्या ग्रामविकास व पंचायतराज मंत्रालया अंतर्गत उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान हा स्वतंत्र कायमस्वरूपी विभाग म्हणून आस्थापनेला मान्यता देऊन सर्व कार्यरत कंत्राटी अधिकारी कर्मचारी यांना शासनाच्या समक्ष पदावर कायमस्वरूपी सेवेत समाविष्ट करून घेण्यात यावे या प्रमुख मागणीसाठी आज उमेद अभियानांतर्गत असलेल्या हजारो महिलांनी बुलढाणा जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला आहे. तर ३ ऑक्टोबर पर्यंत शासनाने आंदोलनाची दखल न घेतल्यास टप्प्याटप्प्याने आंदोलनाची तीव्रता वाढवून उपोषण करणार आहोत अशा प्रतिक्रिया उमेदच्या महिलांनी दिल्या आहेत.

### उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साईचरणी लीन



दैनिक आपला विदर्भ

**शिर्डी/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्याचे उप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी श्री साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेतले. यावेळी महसुल व पशु संवर्धन आणि दुग्ध विकास मंत्री, तथा अहमदनगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, श्री साईबाबा संस्थान तदर्थ समिती सदस्य तथा जिल्हाधिकारी सिध्दाराम सालीमठ, संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी तुकाराम हुलवळे आदी उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्याचे उप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी श्री साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेतल्यानंतर त्यांचा सत्कार करताना श्री साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर. यावेळी महसुल व पशु संवर्धन आणि दुग्ध विकास मंत्री, तथा अहमदनगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी तुकाराम हुलवळे आदी उपस्थित होते.

### कृषी विभागाच्या योजने अंतर्गत आ.लता सोनवणे यांच्या हस्ते शेतकऱ्यांना साहित्य वाटप



दैनिक आपला विदर्भ

**जळगाव /प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासन कृषी विभागाच्या वतीने शेतकऱ्यांसाठी विविध योजना लागू करण्यात आलेले आहे. त्या योजनेअंतर्गत ऑनलाइन फॉर्म भरल्यानंतर लाभार्थी शेतकऱ्यांना फवारणी पंप, नॅनो युरिया वाटप करण्यात आले. तसेच गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सानुग्रह अनुदान योजना अंतर्गत शेतकऱ्यांच्या अपघाती मृत्यू झाला असल्यास त्याच्या वारसाला दोन लाख पर्यंत मदत मिळते. चोपड्याचे आमदार लता सोनवणे, माजी आमदार प्रा चंद्रकांत सोनवणे, घनश्याम अग्रवाल यांच्या हस्ते लाभार्थी शेतकऱ्यांना साहित्य वाटप करण्यात आले. तर गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघाताचे तालुक्यातील पाच कुटुंबांना दोन लाखाचे धनादेश वाटप करण्यात आले. यावेळी तालुका कृषी अधिकारी दीपक साळुंखे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती नरेंद्र पाटील, राजेंद्र पाटील, गोपाल चौधरी रावसाहेब पाटील, कल्पना पाटील यांच्यासह पदाधिकारी कार्यकर्ते व लाभार्थी शेतकरी तसेच कृषी विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

### धर्मवीर २ चित्रपटचे सोलापुरात मोठ्या जल्लोषात स्वागत



दैनिक आपला विदर्भ

**सोलापूर/प्रतिनिधी :** धर्मवीर २ चित्रपटचे सोलापुरात मोठ्या जल्लोषात स्वागत करण्यात आले. शिवसैनिकांनी फटाक्यांची अतिशबाजी, पोस्टरवर दुग्धभिषेक करत मोठा जल्लोष केला. सोलापुरात या चित्रपटाचे जिल्हाप्रमुख मनीष काळजे यांच्यावतीने फर्स्ट डे फर्स्ट शो हा शिवसैनिकांसाठी मोफत आयोजित करण्यात आला. यावेळी महिला प्रेक्षकांचे आणि शिवसैनिकांचे फेटे बांधून स्वागत करण्यात आले. राज्यभरात धर्मवीर २ चित्रपट प्रदर्शीत होताच शिवसैनिकांमध्ये एक उत्साह पाहायला मिळतोय. आगामी निवडणुकांच्या तोंडावर हा चित्रपट प्रदर्शित होतं असल्याने एकप्रकारे शक्ती प्रदर्शन या चित्रपटाच्या निमित्ताने सर्वच ठिकाणी शिवसैनिक करताना दिसतायत.

# जनतेला चांगली आरोग्य सेवा देण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकार एकत्र काम करू

## केंद्रीय आयुष आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रतापराव जाधव

दैनिक आपला विदर्भ






**बुलडाणा/प्रतिनिधी :** देशातील आरोग्य सेवेत सुधारणा करण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकार मध्ये समन्वय असणे गरजेचे आहे येणाऱ्या काळात देशातील जनतेला चांगली आरोग्यसेवा देण्यासाठी एकत्र काम करू या .असे आवाहन केंद्रीय आयुष आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केले.

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत सुरू असलेल्या कामाचा आढावा केंद्रीय आयुष आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी घेतला आरोग्य मंत्रालयात झालेल्या या आढावा बैठकीला आरोग्य मंत्रालयातील प्रमुख अधिकाऱ्यांसह पंजाब, कर्नाटक आणि पश्र्चिम बंगाल राज्याचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी आरोग्य विभागाच्या वतीने देण्यात येणाऱ्या पायाभूत सुविधा प्रकल्प , मानव संसाधन , राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत आर्थिक प्रगती आणि भौतिक प्रगतीचे सर्वसमावेशक मूल्यांकन , १५ वा वित्त आयोग , आयुष्यमान भारत तसेच प्रधानमंत्री जन औषधी योजनाचा आढावा केंद्रीय आयुष आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी घेऊन योजने संदर्भातील काही सूचनाही संबंधित अधिकाऱ्यांना केल्यात.

देशातील नागरिकांना चांगले आरोग्य सुविधा देण्याच्या दृष्टिकोनातून केंद्र आणि राज्य सरकारने समन्वयातून काम करणे गरजेचे आहे असे सांगून आरोग्य सुविधा सुधारण्याच्या दृष्टिकोनातून अधिकाऱ्यांच्या काही सूचनाही त्यांनी ऐकून घेतल्या.

येणाऱ्या काळात देशातील नागरिकांना चांगली आरोग्य सुविधा देण्याच्या दृष्टिकोनातून केंद्र आणि राज्य सरकारने एकत्र काम करणे गरजेचे आहे केंद्र आणि राज्य सरकारच्या समन्वयातून लोकांसाठी निर्माण केलेल्या योजना त्यांच्यापर्यंत पोहोचविणे आणि देशात निर्माण झालेल्या आरोग्याच्या समस्यांचं निराकरण समन्वयातून करणे तसेच केंद्राकडून विविध योजना अंतर्गत दिल्या जाणाऱ्या निधीचा उपयोग त्याच कामावर करणे आवश्यक असल्यासचे त्यांनी यावेळी सांगितले ..

## मालेगांव नगर पंचायत पथ विक्रेता समिती अविरोधक

### गजानन सारस्कर याच्या प्रयत्नाला यश

दैनिक आपला विदर्भ

■ प्रकाश भुरे



**मालेगांव :** मालेगाव येथील नगर पंचायत पथ विक्रेता समिती ची ८ उमेदवाराची निवडनुक जाहिर झाली असता दिनाक २४/९/२०२४ रोजी घेण्यात आली त्या वेळी गजानन सारस्कर पॅनल च्या आठ उमेदवारानी अर्जे भरले होते त्यात सर्वसाधारन मध्ये सीताराम काटेकर संतोष सारस्कर अल्पसंख्यान मध्ये सलीम खान अ जाती मध्ये भास्कर गुडदे आ जमाती मध्ये राधा धांद्रे विकलांग महिला गट राखीव शारदा चव्हान इतर मार्गास्वगीय मध्ये अतिश बोकन सर्व साधारण मध्ये सुनंदा बळी असे गजानन सारस्कर व पप्पू कुटे पॅनल चे आठ हि उमेदवार अविरोधक निवडून आले यावेळी नगरपंचायत चे मुख्याधिकारी सोनुने साहेब यांनी प्रमाण पत्र देवुन पुढील वाटचालीस शुभेच्या दिल्या यावेळी गजानन सारस्कर चंदु जाधव दत्ता फोफळे पप्पु कुटे किशोर शिन्दे राहुल सानप विजय भुरे रुषीकेश सारस्कर अनिकेत सारस्कर हे उपस्थित होते

## निराधार लाभार्थ्यांचे अनुदान दोन महिन्यापासून रखडले

### पातूर तालुक्यातील ग्रामीण भागातील चित्र

दैनिक आपला विदर्भ

■ नासीर शेख

**पातूर :** पातुर तालुक्यातील ग्रामीण भागाच्या निराधार लाभार्थ्यांचे अनुदान दोन महिन्यापासून रखडले आहे त्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. राज्यातील महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी त्यांच्या आरोग्य आणि पोषणामध्ये सुधारणा करणे कुटुंबातील त्यांची निर्णायक भूमिका मजबूत करण्यासाठी मुख्यमंत्री माजी लाडकी बहीण योजना सुरू करण्यात आली. या योजनेमुळे महिलांना राज्य शासनाने ठरवलेल्या वेळेनुसार अनुदान प्राप्त होत आल्याने सर्वत्र महिला वर्गांमध्ये आनंदाचे वारे वाहू लागले आहेत. त्याच पार्श्र्वभूमीवर मात्र पातूर तालुक्यातील ग्रामीण भागात संजय गांधी निराधार योजनेसह श्रावण बाळ योजनेचेही अनुदान मिळणे अपेक्षित होते.परंतु गेल्या दोन महिन्यांपासून निराधाराचे अनुदान रखडल्याने निराधार योजनेचे कारभार ढेपाळल्याचे चित्र आहे. निराधार योजनेच्या लाभार्थ्यांना वाऱ्यावर सोडून ऐन सनासुदीची काळात त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. त्यामुळे निराधार लोकांकडून नाराजीचे सूर उमटत आहे. निराधार लाभार्थ्याकडे शासनाने पाठ फिरवल्याने अक्षरशा त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. याकडे प्रशासनाने दखल दखल घेऊन निराधाराचे अनुदान त्वरित देण्याची मागणी निराधार लाभार्थ्याकडून होत आहे.

मी निराधार योजनेची लाभार्थी असून, गेल्या दोन ते तिन महिन्यापासून निराधार योजनेचे अनुदान मिळाले नाही, अनुदान जमा झाले की नाही, या आशेने बँकेमध्ये जाऊन येरझार घालत आहे. परंतु अद्यापही अनुदान जमा झाले नाही.
**–सीताबाई राठोड**
**निराधार लाभार्थी सावरगाव.**

#### निराधार योजनेचा कारभार ढेपाळला

शासनाकडून मिळालेल्या निराधार योजनेच्या अनुदानावर वृद्ध कुटुंबाचा उदरनिर्वाह चालते, मात्र निराधार योजनेचा कारभार ढेपाळल्याने दोन महिन्यापासून निराधार लाभार्थ्यांचे अनुदान मिळाले नसल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. शासनाने त्वरित दखल घेऊन अनुदान खात्यात जमा करावे

## लक्ष्मण टेकाळे व रेणुका टेकाळे आदर्श दांपत्य पुरस्काराने सन्मानित

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप



**लोणार:** लोणार तालुक्यातील भुमराळा येथील शेतकरी आदर्श गाव संकल्प व प्रकल्पाचे ग्राम कार्यकर्ते लक्ष्मण टेकाळे आणि हिरकणी ग्राम संघाच्या अध्यक्ष रेणुका टेकाळे यांना जन स्वप्नपूर्ती च्या वतीने आदर्श दांपत्य पुरस्कार प्रदान करण्यात आला.

भुमराळा या छोट्याशा गावामध्ये जिजाऊ कोल्ड प्रेस ऑइल मिल सुरू करून गावातील आणि परिसरातील लोकांना करडी सूर्यफूल तीळ भुईमूग मोहरी जवस या तेलबिया पासून शुद्ध आणि नैसर्गिक तेल गाळप करून देण्याचा उपक्रम राबवत असून ग्रामीण आणि शहरी भागातील लोकांना घरपोच शुद्ध आणि नैसर्गिक तेलाचा पुरवठा ते करतात याची दखल घेऊन सपत्नीक या दांपत्याचा सत्कार मराठा सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष शिवश्री पुरुषोत्तम जी खेडेकर यांच्या उपस्थितीत तर सेवा संकल्प प्रतिष्ठानचे डॉक्टर नंदकुमार पालवे व डॉक्टर आरती पालवे यांच्या हस्ते के. व्ही. प्राइड हॉटेल मेहकर येथे २२ सप्टेंबर रोजीप्रदान करण्यात आला लक्ष्मण टेकाळे यांनी ग्राम कार्यकर्ता म्हणून काम करत असताना गावकऱ्यांच्या सहकार्याने भुमराळा गावामध्ये गाव हागणदारी मुक्त केले असून आदर्श गाव प्रकल्प यशस्वीरित्या राबवून गावाचा चेहरा मोहरा पालटण्याचा प्रयत्न केला आहे.

# नुकसानीच्या पाण्यासाठी आ. डॉ. रायमुलकर शेतकऱ्यांच्या बांधावर

## पंचनामे करण्याचे महसूल प्रशासनाला निर्देश

दैनिक आपला विदर्भ





**डोणगाव/प्रतिनिधी :** गत आठ दिवसांपासून सुरू असलेल्या परतीच्या पावसाने सोगवण्यासाठी आलेल्या सोयाबीनचे प्रचंड नुकसान झाले आहे,तर गत दोन दिवसापूर्वी मतदारसंघातील अनेक भागात ढगफुटी सदृश्य पाऊस झाल्याने आताशी आलेले सोयाबीनचे पिक नैसर्गिक आपत्तीने हिरावून घेतल्याने मोठे आर्थिक संकट शेतकऱ्यांसमोर उभे राहिले आहे. या संकटातून शेतकऱ्यांना धीर मिळावा, यासाठी मेहकर मतदारसंघाचे आ.डॉ.संजय रायमुलकर यांनी थेट बांधावर जाऊन पाहणी केली. तसेच यावेळी महसूल प्रशासनाला पंचनामे करण्याचे निर्देश देत शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी पाठपुरावा करू अशी ग्वाही दिली. गत आठ दिवसांपासून महाराष्ट्रात परतीच्या पावसाने थैमान घातले आहे. बुलढाणा जिल्ह्यातील अनेक भागात ढगफुटी सदृश्य पाऊस झाल्याने सोंगणीस आलेले सोयाबीनचे मात्र प्रचंड नुकसान झाले आहे. मेहकर मतदार संघातही डोणगाव परिसर इतर परिसरात ढगफुटी सदृश्य पाणी होऊन सोयाबीन खराब झाली आहे. तर अनेक शेतकऱ्यांनी सोगूंन ठेवलेली सोयाबीन पावसात वाहून गेले त्याचबरोबर या पावसाने बागायती व फळबागांचे सुद्धा प्रचंड नुकसान झाले आहे. या नुकसानीमुळे शेतकऱ्यांवर मोठे आर्थिक संकट निर्माण झाले आहे. पेरणीपसून सोंगणीपर्यंत शेतकऱ्यांनी एकरी जवळपास २१ ते २२ हजाराच्यावर खर्च केला आहे. मात्र आता सोयाबीन कापणीला सोंगणीला येतात परतीच्या पावसाने सोयाबीन पिकाचे प्रचंड नुकसान केले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांवर आर्थिक संकट निर्माण झाले असताना लोकप्रतिनिधी या नात्याने या मतदारसंघाचे आ.डॉ.संजय रायमुलकर यांनी थेट बांधावर जात नुकसानीची पाहणी केली. तसेच यावेळी महसूल प्रशासनाला पंचनामे करून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. तर शेतकऱ्यांसोबत संवाद साधून झालेल्या नुकसानीचा मोबदला म्हणून आर्थिक मदत मिळवून देण्याची ग्वाही देत शेतकऱ्यांना धीर दिला.

परतीच्या पावसाने झालेल्या नुकसानीची पाहणी करण्यासाठी आ.डॉ. संजय रायमुलकर,सुरेश वाळुकर, उपविभागीय अधिकारी रवींद्र जोगी, तहसीलदार निलेश मडके,तालुका कृषी अधिकारी किशोर काळे, अजय पिंपरकर, माजी कृषी व पशुसंवर्धन सभापती राजेंद्र पळसकर उपगटविकास अधिकारी संदीप मेटांगळे, केशवराव जागृत आणि गोहगाव दांदडे परिसरातील नागरिकांनी नुकसानग्रस्त भागाची पाहणी करून खचलेल्या शेतकऱ्यांना धीर दिला...